# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १३२/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अतुल चंद्रकांत सोनिग्रा,<br>३८७५, आदित्य , सोलापूर रोड,<br>बार्शी, जि. सोलापूर. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, ऊर्जा नगर, सोलापूर | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर | |
| ३) | उप कार्यकारी अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>शहर उप विभागीय कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. अतुल चंद्रकांत सोनिग्रा, बार्शी, जि. सोलापूर यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर येथे दि. ५.६.२०११ रोजी तक्रार दाखल केली होती. कक्षाने दि. २९.७.२०११ रोजी आदेश दिला. कक्षाने दिलेला आदेश मान्य नसल्यामुळे दि. ११.१०.२०११ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे " अ " फॉर्ममध्ये अपील दाखल केले.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

सदर अपीलाची सुनावणी दि. ९.११.२०११ रोजी कोल्हापूर येथे ठेवण्यात आली होती. दि. २.११.२०११ रोजी ग्राहकाचे विनंतीनुसार सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. त्यामुळे दि. २७.१२.११ रोजी कोल्हापूर येथील मंच कार्यालयात सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीच्या वेळेस ग्राहक स्वतः तसेच वि.प.तर्फे श्री. प्रकाश सुपेकर, उप कार्यकारी अभियंता, बार्शी शहर उप विभाग हजर होते.

श्री. सोनिग्रा हे बार्शी शहर येथील महावितरणचे औद्योगिक ग्राहक (ग्राहक क्रमांक ३३३०१०००५०१८) असून दि. १६.२.२०११ रोजी त्यांच्या कनेक्शनसाठी बसविण्यात आलेल्या सि.टी. ऑपरेटेड मीटरमध्ये बिघाड झाल्याचे कळाले. त्यांनी स्थानिक कनिष्ठ अभिंयता समवेत पहाणी केली असतां C.T. (Current Transformer) जळाल्याचे लक्षात आले. वितरण कंपनीने C.T. operated Meter Cabinet ची संपूर्ण किंमत रु. २२,४००/- भरण्यास सांगितले.

श्री. सोनिग्रा यांनी नाईलाजास्तव दि. १७.२.२०११ रोजी रु. २२,४००/- अंडर प्रोटेस्ट भरुन विद्युत पुरवठा पूर्ववत करुन घेतला. उप कार्यकारी अभियंता, शहर उप विभाग बार्शी यांना दि. २९.४.२०११ रोजी लेखी तक्रार देऊन रु. २२,४००/- परत मिळावी अशी मागणी केली.

सुनावणीच्यावेळी श्री. अतुल सोनिग्रा ग्राहक यांनी बाजू मांडली. त्यांच्या म्हणण्यानुसार मीटर संचावर व सीटी संचावर लोड येत असल्याची तक्रार आम्ही लेखी स्वरुपात कार्यकारी अभियंता व उप कार्यकारी अभियंता यांना दि. १६.२.२०११ रोजी देवूनही सदर बाबतीत योग्य कार्यवाही झाली नाही. आमच्या कारखान्यास २०० केव्हीए रोहित्रामधून विद्युत पुरवठा कमी दाबाने होतो व करंट वाढल्यामुळे मीटर मधील सीटी गरम होतात. सीटी निकामी झाल्यामुळे विद्युत मीटर बंद पडतो. वितरण कंपनीच्या कमी दाबाच्या विद्युत पुरवठ्यामुळे मीटर जळते. मीटर सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी वितरण कंपनीची आहे. तरी माझ्याकडून मीटरपोटी रु. २२४००/- भरुन घेतलेले आहेत ते परत मिळावेत अशी मंचाकडे मागणी केली. यापूर्वी केस क्र. ३६३/१०-११ अन्वये मंचाने तसे आदेश दिले होते.

वितरण कंपनीच्या वतीने श्री. प्रकाश सुपेकर, उप कार्यकारी अभियंता, बार्शी शहर उप विभाग यांनी ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांचा आदेश खालील प्रमाणे असून तो बरोबर आहे असे सांगितले.

"महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग विनियम २००५ मधील १४.२.२ व १४.२.४ या तरतुदीनुसार महावितरण कंपनीने जळालेल्या मिटरची किंमत ग्राहकाकडून वसूल केलेली आहे. त्यामुळे मिटरची ग्राहकाने भरलेली रक्कम रु. २२४००/- परत करणे उचित नाही. "

सदर ग्राहकाचा मंजूर भार ६५ एच.पी. असून त्याच्याकडून ८२ एच.पी.चा वापर होत असल्याचे M.R.I. डाटा वरुन आढळून आले. सदर ग्राहकाचे मिटरींग कॅबीनेट कार्यकारी अभियंता, चाचणी विभाग सोलापूर यांचेकडे तपासणी केली असतां त्यांनी दि. ६.७.२०११ रोजीच्या पत्रानुसार कळविले की, सी.टी.पी.टी. युनिटची " आर " फेज जळालेली आहे व मिटरच्या अंतर्गत असलेल्या ट्रान्स्फॉर्मर कमी शक्तीचा (weak) झाला आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

सदर ग्राहकाचे मिटरचा Data Retrieve केला असता त्यामधूनखालील निष्कर्ष सूचित होत आहे.

अ) मंजूर विद्युतभार ( Sanctioned Load) - ५४ केव्हीए

ब) नोंद झालेला विद्युतभार (Recorded Load in KVA in the meter) - ६७.७२ केव्हीए (दि. ५.२.२०११)

सदर ग्राहकाचे सी.टी. ऑपरेटेड मीटर दि. १६ फेब्रुवारी २०११ रोजी अतिरिक्त विद्युतभारामुळेच म्हणजे ओव्हरलोडींगमुळेच जळाला आहे.

सदर ग्राहकांच्या ट्रन्सफॉर्मरवरील इतर विद्युत ग्राहकांची कमी विद्युतदाबाबाबत तक्रारी नाहीत.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

कंपनीने ग्राहकांकडून भरुन घेतलेली मीटरची किंमत परत करणे योग्य होईल का ?

उत्तर : नाही

आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

विद्युत कायदा २००३ मधील तरतुदीनुसार बनविलेला Central Electricity Authority ( Installation and Operation of Meters ) Regulation 2006 चा विचार करणे आवश्यक वाटते. रेग्यूलेशनच्या-

(१) कलम २ (पी) प्रमाणे सीटीपीटी हे मीटरचे भाग आहेत.

(२) कलम ६ (२) प्रमाणे ग्राहकाचा मीटर हा विद्युत पुरवठाधारकाच्या मालकीचा असणे

(३) कलम १० प्रमाणे मीटरचे संचलन, चाचणी व देखभाल विद्युत पुरवठाधारकाने केला पाहिजे.

(४) कलम १५ (२) प्रमाणे जर ग्राहकाने पुरवठाधारकास मीटरचे वीज वापराच्या प्रमाणात अयोग्य रिडींग असेल, मीटर बंद असेल, सिल खराब झाले असल्यास, मीटर खराब व जळाले असल्यास कळविल्यास पुरवठाधारकाने सप्लाय कोडमधील पध्दतीनुसार कारवाई करेल.

दि. ६.७.२०११ रोजी टेस्टींग डिव्हीजन, सोलापूर यांनी सदर सी.टी. ऑपरेटेड मीटरचे टेस्टींग करुन अहवाल दिला आहे. टेस्टींग करतेवेळी श्री. डोळे, कनिष्ठ अभियंता, बार्शी शहर उप विभाग हे हजर होते. सदर अहवालाचे अवलोकन करतां दि. ५.२.२०११ रोजी ६७.७२ केव्हीए व ६५.७५ केडब्ल्यू. Maximum Demand ची नोंद झालेली आहे. कार्यकारी अभियंता, टेस्टींग डिव्हीजन, सोलापूर यांचा अहवाल खालील प्रमाणे -

Make - Secure Meter Udaipur

Sr. No. MSE 48756 CTR -100/5 Amps.

Plug in TypeCT/PT unit is found burnt. R phase PT primary stud found melted and missing. Also same unit found cracked. This may weaken the internal instrument transformer of the energy meter.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

दि. २१.२.२०१२ रोजी मंचाचे सदस्य सचिव श्री. जी.बी. पानकर यांनी टेस्टींग डिव्हीजन सोलापूर येथे प्रत्यक्ष भेट देऊन सदर मिटरचे टेस्टींग रेकॉर्ड तपासले असतां, श्री. सोनिग्रा यांच्या मिटरची व सीटीची माहिती बरोबर असल्याची खात्री केली. श्री. सोनिग्रा यांनी सुनावणीच्यावेळी सीटी Ashmor कंपनीचा असल्याचा केलेला दावा खोटा आहे, कारण सी.टी. Stelmec कंपनीच्या आहेत. टेस्टींग लॅबोरेटरीचे इनचार्ज श्री. मुनीर, कनिष्ठ अभियंता व कार्यकारी अभियंता श्री. आडके यांचेशी चर्चा केली असतां, सदर मीटर नादुरुस्त झाल्यामुळे परत वापरा येणार नाही असे सांगितले.

टेस्टींग अहवाल व सुनावणीच्यावेळेस श्री. सुपेकर, उप कार्यकारी अभियंता, बार्शी शहर उप विभाग यांचे स्पष्टीकरण लक्षांत घेतां, सदर ग्राहकाचा मीटर व सीटी जळाल्यामुळे मिटीरींग कॅबिनेटीची पूर्ण किंमत रु. २२,४००/- वितरण कंपनीने भरुन घेतलेली आहे, ती सप्लाय कोड १४.२.२ व शेड्यूल ऑफ चार्जेस प्रमाणे योग्य आहे. खालील प्रमाणे आदेश -

## **आदेश**

१) सप्लाय कोड १४.२.२ व शेड्यूल ऑफ चार्जेस प्रमाणे वितरण कंपनीने सी.टी. ऑपरेटेड मीटरची भरुन घेतलेली रक्कम योग्य आहे.

२) ग्राहकास ज्या रोहित्रावरुन विद्युत पुरवठा होतो, त्याची व्यवस्थित देखभाल करुन योग्य दाबाने विद्युत पुरवठा करावा व तसे मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बाद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

( जी. बी. पानकर )<br>
सदस्य सचिव

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using SmartPDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com